महत्वाचे


# पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर.
## ( विशेष शाखा )
कार्यालय दुरध्वनी क. – (0721) 2551009 फॅक्स – (0721) 2551010
Email - Sb.cpamt@mahapolice.gov.in , Website- http://www.amravaticitypolice.org


क्रमांक :–पोआअ/विशा / कोरोनामनाईआदेश/९२२/२०२०, अमरावती, दिनांक २३/०३/२०२०

विषय :– फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक २३.०३.२०२० चे १८.०० ते दिनांक ३१.०३.२०२० चे २४.०० वा.चे दरम्यान वाहन वापरास व वाहतुकीस मनाई आदेश

❊❊❊

1. ज्याअर्थी, कोरोना विषाणुचा संसर्ग व प्रसार भारतात, महाराष्ट्रात, अमरावतीमध्ये गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस आयुक्त, कार्यालय, अमरावती शहर यांचेकडील जा. कं. ९२१/२०२०,दिनांक २२.०३.२०२० अन्वये अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश अंमलात आहे.
2. परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जिविताला, आरोग्याला किंवा सुरक्षिततेला संकट उत्पन्न होवू शकते. याबाबत माझी खात्री झालेली आहे. त्याअनुषंगाने सारासार विचार करुन तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या वाहतूकीस मनाई करण्यासाठी स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवारं कामानिमित्त अमरावती शहरात प्रवेश करणारे यांना उदेशुन आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.
3. महाराष्ट शासन, राजपत्र असाधारण भाग – १ मध्ये उप–विभाग यांचेकडील अधिसुचना कमांक ३ मधील पान कं. ४ मधील फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ चा कं. एमएससी–१२७४/व्ही–एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३(II-1974) चे कलम २१ अन्वये पोलीस आयुक्त यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करुन कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.
4. त्याअर्थी, मी, संजयकुमार बाविस्कर, पोलीस आयुक्त, अमरावती शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) अन्वये **कोणत्याही व्यक्तीला अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील कोणत्याही रस्त्यांवर, सार्वजनिक वाहतूकीने रस्त्यांवर, गल्लोगल्ली याठिकाणी सायकल तसेच पारंपारीक व व अपारंपारीक इंधनावर चालणा–या मोटार सायकल (गिअरसह/शिवाय), सर्व प्रकारच्या तीनचाकी वाहने, हलकी वाहने, मध्यम वजनाची वाहने, जड वाहतूकीची वाहने यांचा प्रवास व वाहतूक यासाठी वापर करण्याची मनाई करणारा आदेश दिनांक २३.०३.२०२० चे १८.०० वा. ते ३१.०३.२०२० चे २४.०० वा.चे दरम्यान लागू करीत आहे.**
5. **या आदेशाने खाजगी प्रवासी वाहने तसेच सर्व प्रकारच्या रिक्षा, टॅक्सी (ॲप आधारीत ओला, उबर व तत्सम वाहनांसह) या सर्वांना वाहतूकीस मनाई करण्यात येत आहे.**

Scanned with CamScanner

6. सदर आदेश खालील बाबतीत लागू होणार नाहीत. –

१. पोलीस व आरोग्य विभाग तसेच आपत्ती निवारण व्यवस्थापनाशी संबंधित (फक्त कर्तव्यार्थ )

२. तातडीने रुग्ण वाहतूक व हॉस्पीटलमधील डॉक्टर व पॅरा मेडीकल स्टॉफ (फक्त कर्तव्यार्थ )

३. अत्यावश्यक सेवा उदा. विज, पाणी पुरवठा, दुरसंचार, अग्निशमन, बॅंक व एटीएम, राष्टीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पायाभूत विकासाशी संबधित उद्योग ( फक्त कर्तव्यार्थ व तातडीचे असल्यास)

४. जिवनावश्यक सेवा, वस्तु व माल याची वाहतूक

५. प्रसार माध्यम व त्यांचे प्रतिनिधी (फक्त कर्तव्यार्थ )

६. माझेवतीने व जिल्हाधिकारी, अमरावती यांनी परवानगी दिलेले व्यक्ती यासाठी पुढील दुरध्वनी संपर्क ०७२१–२५५१००० अथवा ई मेल **cro.cpamt@mahapolice.gov.in** यावर लेखी संपर्क साधावा.

[ टीप – १. वर नमुदप्रमाणे सवलत दिलेल्या अधिकारी व कर्मचारी तसेच खाजगी व्यक्ती यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यसाठी असलेले नेमणुकी बाबतचे आदेश तसेच रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

२. राज्यातील महत्वाची शहरांना एकमेकाशी जोडणारे मार्ग जे अमरावती शहरातून जातात अशा मार्गावरील वाहतूकीतील बदलाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील. ]

7. उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजाविणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रकिया संहिता सन १९७३ कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त तसेच परीमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझे सही शिक्यानिशी आज दिनांक २३.०३.२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण – अमरावती
दिनांक २३.०३.२०२०

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

(संजयकुमार बाविस्कर)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

Scanned with CamScanner